दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१७५ | शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-175 | Saturday, Dt.28 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मद्य घोटाळ्याच्या आरोपातून केजरीवालांसह २२ जणांची निर्दोष मुक्तता

## कोर्टाच्या निकालानंतर अरविंद केजरीवाल ढसाढसा रडले



नवी दिल्ली : दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याच्या आरोपातून राऊज एवेन्यू कोर्टाने माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह २२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या घोटाळ्याच्या आरोपात अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, विजय नायर यांच्यासह इतरांवर गंभीर आरोप झाले होते. मात्र या सर्व आरोपातून कोर्टाने निर्दोष मुक्तता केल्यानं अरविंद केजरीवाल यांच्या डोळयात अश्रू आले. मोदी-शाह यांनी षडयंत्र रचले आणि आम्हाला भ्रष्टाचारी ठरवले होते असा आरोप केजरीवाल यांनी केला.

कोर्टाने आरोपातून निर्दोष मुक्तता केल्यानंतर अरविंद केजरीवाल भावूक झाले. अरविंद केजरीवाल म्हणाले की, सत्येचा विजय होतो हे आम्ही कायम म्हणत होतो. आमचा भारतीय न्यायव्यवस्थेवर विश्वास आहे. न्यायाधीशांनी आम्हाला न्याय दिला. सत्याचा विजय झाला आहे. आम आदमी पक्षाला संपवण्यासाठी नरेंद्र मोदी-अमित शाह यांनी मिळून सर्वात मोठे षडयंत्र रचले. आमच्या नेत्यांना जेलमध्ये टाकले गेले. विद्यमान मुख्यमंत्र्यांना घरातून बाहेर काढत ६ महिने जेलमध्ये ठेवले. उपमुख्यमंत्र्यांना २ वर्ष जेलमध्ये ठेवले. हे सगळे खोटे गुन्हे होते.

आम्हाला भ्रष्टाचारी ठरवण्यात येत होते असं सांगताना अरविंद केजरीवाल यांच्या डोळ्यात अश्रू आले. तर मी भ्रष्ट नाही. मी माझ्या प्रामाणिकपणाने जीवन जगतोय. आमच्यावर खोटे आरोप लावले परंतु आज कोर्टात सिद्ध झाले. अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया असो आम आदमी पक्ष हा प्रामाणिक आहे. सत्तेसाठी पंतप्रधानांनी देशाशी खेळू नये. संविधानाशी खेळू नका. तुम्हाला सत्ता हवी तर चांगली कामे करा. आज देशासमोर कित्येक प्रश्न आहे. महागाई, बेरोजगारी त्याशिवाय देशात रस्त्यांची दुरावस्था आहे. सगळीकडे प्रदुषण आहे. चहुबाजूने देशात वेगवेगळ्या समस्या आहेत. त्या समस्यांचे निवारण करून सत्ता मिळवा. केजरीवाल आणि आम आदमी पक्षावर खोटे आरोप का करता असा सवालही केजरीवाल यांनी उपस्थित केला.

कारस्थान करणे पंतप्रधानांना शोभत नाही

२४ तास राजकारण करणे, खोटे आरोप करून विरोधकांना अडकवणे, त्यांना जेलमध्ये टाकणे हे पंतप्रधानांना शोभत नाही. त्यातून देश पुढे जाणार नाही. देशातील जनतेचे प्रश्न सुटले तर देश पुढे जाईल असेही केजरीवाल यांनी म्हटले आहे.

दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याच्या आरोपातून अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह इतर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोप सिद्ध करण्यात सीबीआय अपयशी ठरली. या प्रकरणात कुठलेही गुन्हेगारी षडयंत्र दिसत नाही. त्याशिवाय काही ठोस पुरावेही नाहीत. संपूर्ण खटला पाहिला तर त्यात गुन्हेगारी कृत्य झाल्याचे सिद्ध होत नाही. कुठल्याही ठोस पुराव्यांशिवाय एखाद्याला अडकवणे यावरून न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी सीबीआयला फटकारले. आरोपपत्रात अनेक त्रुटी आहेत ज्यात पुरावे, साक्षी अपु-या आहेत असंही कोर्टाने म्हटले.

## पिंपळनेर शिवारामध्ये कांद्याच्या पिकात अफूची बेकायदेशीर शेती करणाऱ्यावर पोलिसांचा छापा



पोलीस स्टेशन पिंपळनेरच्या पथकाने मौजे पिंपळनेर शिवारात एका शेतावर छापा टाकून, कांद्याच्या पिकात लपवून केलेली अफूची बेकायदेशीर लागवड उघडकीस आणली आहे. या कारवाईत सुमारे ४२ किलोपेक्षा जास्त वजनाची अफूची झाडे जप्त करण्यात आली असून आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. (छऊझड) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा तपशील: दिनांक २७.०२.२०२६ रोजी पिंपळनेर पोलिसांना खात्रीशीर बातमी मिळाली होती की, विशाल भगवान इतापे (वय २९, रा. पिंपळनेर) हा आपल्या शेतात अफूच्या झाडांची बेकायदेशीर लागवड व जोपासना करत आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने आणि महसूल विभागाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दुपारी १५.०० वाजता सदर शेतावर छापा टाकण्यात आला.

जप्त केलेला मुद्देमाल: अफूची झाडे: शेतातील कांदा व लसूण पिकाच्या मध्यभागी लावलेली अफूची हिरवीगार झाडे पोलिसांनी उपटून जप्त केली. एकूण वजन: जप्त केलेल्या अफूच्या झाडांचे एकूण वजन ४२ किलो ३५५ ग्रॅम भरले.बाजार मूल्य: जप्त करण्यात आलेल्या या मालाची अंदाजे किंमत १०,५८,८७५/- रुपये इतकी आहे.

कारवाई पथक: सदर कारवाई मा नवनीत कॉंवत, पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक, पूजा पवार पोलीस उप अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात सपोनि श्री. घुगे, पोउपनि गोलवाल, शिंदे, ग्रेड पोउपनि आत्माराम गर्जे आणि पोलीस कर्मचारी वनवे, घुमरे, पठाण, ढाकणे, तावरे व चालक पवार यांच्या पथकाने केली. या मोहिमेत महसूल विभागाचे प्रतिनिधी म्हणून श्री. प्रशांत ढोले (ग्राम महसूल अधिकारी) आणि कृषी सहाय्यक शिंदे उपस्थित होते. कायदेशीर कारवाई: आरोपी विशाल भगवान इतापे याच्या विरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायदा (छऊझड -लीं, १९८५) च्या कलम ८(क) आणि १५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## न.प.च्या अर्थसंकल्पीय बैठकीत बीडकरांच्या प्रश्नांवर डॉ.सारिका क्षीरसागरांनी वेधले लक्ष

बीड (प्रतिनिधी)

बीड नगरपरिषदेची अर्थसंकल्पीय बैठक शुक्रवारी (दि.२७) पार पडली. या बैठकीत भाजपच्या गटनेत्या नगरसेविका डॉ.सारिका योगेश क्षीरसागर यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध महत्त्वाचे मुद्दे व प्रस्ताव मांडले. बैठकीस समिती अध्यक्ष, नगरसेवक, नगरपरिषद प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अर्थसंकल्पीय बैठकीत डॉ.सारिका क्षीरसागर म्हणाल्या, माजी सैनिकांना घरपट्टी व नळपट्टी नियमानुसार माफ करावी. वाढत्या शहराचा विचार करता पश्चिम बीड शहरासाठी नवीन अग्निशमन केंद्र प्रस्तावित करावे. नवीन भाजी मंडई, फुटमार्केट, स्मशानभूमी, बौद्धविहार आणि डी.पी. रोड प्रस्तावित करण्याची मागणी करण्यात आली. शहर स्वच्छ व हरित ठेवण्यासाठी प्लास्टिकमुक्ती अभियान राबवावे, वृक्षारोपण मोहीम हाती घ्यावी. मोकळ्या जागांमध्ये उद्याने विकसित करावीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवून त्याचे सुशोभीकरण करावे, तसेच भिमसृष्टी परिसरात माता रमाई यांचा पुतळा उभारण्याची मागणी करण्यात आली. स्वच्छता व्यवस्थेसाठी जेसीबी, कॉम्पॅक्टर व इतर साधनसामग्री खरेदी करावी, बिंदुसरा नदी सुशोभीकरणासाठी प्रस्ताव पाठवावा. सार्वजनिक शौचालये व मुताऱ्या बांधण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तारांगण प्रकल्पाचे काम सुरू करावे आणि नगरपरिषद इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प बसविण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. महिलांसाठी बेघर निवारागृह सुरू करावे, हद्दवाढ भागात ५०० दिव्यांचे खांब उभारावेत तसेच सार्वजनिक ठिकाणी पाणपोईची सोय करावी, अशी मागणी करण्यात आली. शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणारे अतिक्रमण तत्काळ हटविण्याबरोबर कर वसुलीसाठी फोन-पे सारख्या डिजिटल प्रणालीवर आधारित ॲप तयार करण्याची सूचना करण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करावे, अशीही मागणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी बैठकीत केली आहे.



### स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण

बीड नगरपरिषदेत अर्थसंकल्पीय बैठक सुरु होण्यापूर्वीच राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ही बैठक पार पडल्यानंतर सर्वसाधारण सभा सुरू झाली. वेळेअभावी सभा तहकुब करण्यात आली असून आज पूर्ण होणार आहे. या सर्वसाधारण सभेत डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरवासीयांच्या प्रश्नावर आवाज उठविला आहे.



## रस्ता सुरक्षा अभियान २०२६ : जिल्हा वाहतूक शाखेच्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेने दि. ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान २०२६ प्रभावीपणे राबविले.

या अभियानांतर्गत जिल्हा वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी पुढाकार घेत वाहनधारकांसाठी विशेष वाहतूक नियम प्रबोधन शिबिराचे आयोजन केले. रस्ता सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन व अपघात प्रतिबंध याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

हे अभियान उत्कृष्टरीत्या राबविल्याबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे व सखाराम घोलप यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.या प्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यात रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी वाहतूक शाखेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राज्यातील रस्ते प्रवास सुरक्षेच्या वाटेवर

## अपघाती मृत्यू ८ टक्यांनी घटले परिवहन विभागाच्या सुरक्षा उपायांना यश

मुंबई : रस्ता सुरक्षेसाठी परिवहन विभागामार्फत राबविलेल्या विविध उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून जानेवारी महिन्यात राज्यात अपघातांमधील मृत्यूंची संख्या ८ टक्क्यांनी तर अपघात २ टक्यांनी घटले आहेत.

रस्ते अपघात आणि मृत्यूमध्ये महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. अपघात आणि मृत्यूची संख्या कमी करण्यासाठी राज्याच्या परिवहन विभागातर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. रस्ता सुरक्षा उपायांमुळे राज्यातील विविध जिल्ह्यांतील मृतांच्या संख्येत घट झाली आहे. राज्यात जानेवारी २०२५ मध्ये ३ हजार १६४ अपघात झाले असून त्यात १ हजार ४२७ जणांचा मृत्यू झाला. यंदा जानेवारी महिन्यात अपघातात ६४ ने घट होऊन राज्यात ३ हजार १०० अपघात झाले. त्यात १ हजार ३१२ जणांना प्राण गमवावे लागले. अपघाती मृत्युची संख्या ११५ ने घटली आहे.

राज्यातील अपघातांची संख्या वर्ष २०२३ पर्यत ५० टक्यांनी कमी करण्याचे परिवहन विभागाचे उदिष्ट्य आहे. रस्ता सुरक्षा जनजागृतीकरिता विशेष दुचाकीस्वार व पादचारी वाचवा अभियान राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्यात सर्वात जास्त दुचाकी अपघात होणा-या ११० रस्त्यावर हेल्मेट बंधनकारक करण्याची अंमलबजावणी सुरू केली आहे.



# बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या दोन नियोजीत लोहमार्ग कामाच्या अडथळे निवारणासाठी...

## स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे शिष्टमंडळ खासदार, जिल्हाधिकारी यांना भेटणार..!



बीड (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- बीड - परळी वैद्यनाथ या मार्गातील कामांमध्ये जे काही अडथळे आहेत त्या अडथळ्याची माहिती घेऊन त्याच्या संदर्भात नियोजन करण्यात याचा विचार प्रशासन पातळीवर करावा. संभाजीनगर - बीड- धाराशिव तसेच अहमदनगर बीड परळी या दोन मार्ग सोबत सविस्तर चर्चा होऊन दोन निवेदन तयार करून तिन्ही जिल्ह्याचे खासदार तसेच बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन तयार करून स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे शिष्टमंडळ खासदार, जिल्हाधिकारी यांना भेटणार असल्याचे समितीच्या बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.

स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समिती जिल्हा बीड ची बुधवारी ( दि. २५ ) समितीची बैठक ज्येष्ठ सदस्य अरुणराव नारायण डाके यांच्या निवासस्थानी घेण्यात आली. समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी सचिव सुनील क्षीरसागर, शांतीलाल पटेल, विष्णुदास बियाणी, रामचंद्र जोशी, अशोक म. शेटे, शिवाजी बन्सी जाधव, सय्यद नवीदुजम्मा, रवी उबाळे, अरुण बाबासाहेब डाके, महम्मद लईक अहेमद, भास्करराव जाधव, तुकाराम साळुंके, विलासराव बडगे, वाय जनार्दन राव, सखाराम मस्के, वैभव स्वामी आदी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अहिल्यानगर - बीड - परळी वैद्यनाथ या लोहमार्गाच्या विकास कामांवर चर्चा करण्यात आली. तसेच चालू असलेल्या अडीअडचणी संदर्भात विचार विनिमय करण्यात आली. या बैठकीमध्ये सध्या चालू असलेल्या कामांमध्ये जे काही अडथळे निर्माण होत आहेत त्याबद्दल चर्चा करण्यात आली, यासंदर्भात लवकरच माहिती घेऊन जिल्हाधिकारी यांना नियोजन देण्यात येणार असल्याचे ठरले. यासोबत धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गासाठी कृती समितीने प्रयत्न करणे यासह सविस्तर माहिती घेऊन बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या समवेत विस्तारीत बैठकीचे नियोजन केले जाणार आहे. तसेच धाराशिव आणि संभाजीनगर येथील खासदार यांना निवेदन देण्याचे संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यासंदर्भात एक सर्व व्यापक बैठक घेऊन या मार्गासाठी या मार्गाची मागणी तीव्र स्वरूपात करण्याचा विचारविनिमय ठरवण्यात आले. या बैठकीमध्ये धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर च्या संदर्भात तसेच अहमदनगर बीड परळी रेल्वे मार्गाच्या कामासंदर्भात माहिती घेऊन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत रेल्वे मंत्रालयांना निवेदन देण्यासंदर्भात साधक बातम्या चर्चा करण्यात आली.

४४ वर्षांचा समितीचा लढा...

१९८२ मध्ये अहिल्यानगर -बीड- परळी वैद्यनाथ लोहमार्गाच्या मागणीसाठी कॉ. अतहर बाबर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. १९८३ दरम्यान तत्कालीन खा. केशर काकू क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली समितीचे शिष्टमंडळ दिल्लीला पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती ग्यानी झैलसींग, केंद्रीय रेल्वेमंत्री गनीखान चौधरी यांना भेटीस गेले. पुढे समितीने स्वातंत्र्य सैनिक मदनलाल सारडा, देशभूषण जैन, स्वातंत्र्य सैनिक बन्सीधर जाधव यांच्या अध्यक्षपदच्या कार्यकाळात आणि निमंत्रक संपादक नामदेव क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन तिव्र झाले. आता समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांनी अहिल्यानगर - बीड- परळी वैद्यनाथ कामे गतीने होण्यासाठी आणि धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर या नवीन लोहमार्ग ची मागणी उचलून धरली आहे. एकूणच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण दोन्ही लोहमार्ग आवश्यक असल्याचे समितीचे सचिव सुनील क्षीरसागर यांनी सांगितले.

### बीडमधून मुंबई अशी रेल्वे चालू होईल...

१९८२ ला स्वातंत्र्यसैनिक मदनलाल सारडा यांनी स्वातंत्र्य रेल्वे स्वातंत्र सैनिक रेल्वे आंदोलन समितीची स्थापना केली त्यामध्ये सचिव म्हणून देश भूषण जैन, स्वतंत्र सैनिक बन्सीधर जाधव, निमंत्रक संपादक नामदेव क्षीरसागर, आणि त्यात २५ जनासह इतर स्वातंत्र सैनिक सहभागी झालेले होते. या लोकांनी रेल्वे परळी बीड अहिल्या नगर साठी दिल्लीला जाऊन त्यांनी ममता बॅनर्जी यांची भेट घेतली तसेच त्यांनी रेल्वेच्या बाबतीत दोन वेळेला दिल्लीला भेट दिली. रेल्वे मंत्र्यांचे भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन काम लवकरात लवकर कसे होईल याची यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती केली होत. त्यानंतर बजेटमध्ये रेल्वेमंत्र्यांनी बीड परळी अहिल्यानगर साठी बजेट ची तरतूद केली. यासाठी तत्कालीन पालकमंत्री विमल मुंदडा यांनी विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री म्हणून रेल्वे साठी लागणारा अर्धा खर्च महाराष्ट्र शासन करण्यास तयार आहे, असे पत्र केंद्र शासनाला दिले तेथून पुढे खरी गती कामाची सुरू झाली. २०१४ मध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेला २८०० कोटी रुपयांची तरतूद मंजूर केली म्हणून कामाला गती आली व आज बीड ते अहिल्यानगर ही रेल्वे दररोज चालू लागली पुढे ऑगस्ट १५ ऑगस्ट पर्यंत बीड मुंबई अशी रेल्वे खात्याची रेल्वे चालू करण्याची नियोजन आहे. म्हणजे बीडकरांची स्वप्न साकार होईल व स्वातंत्र्यसैनिकांनी जो लढा दिला त्याला खरं श्रेय देता येईल, असे ही समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा यांनी सांगितले.

## संपादकीय....

### अय्यर, राहुल आणि नेतृत्वाची घराणेशाही

गांधी घराण्याशिवाय अन्य कोणाही व्यक्तीकडे काँग्रेसची सूत्रे जाऊ नयेत, यासाठी सोनिया आणि राहुल गांधी हे दोघेही दक्ष असतात. मल्लिकार्जुन खर्गे यांना पक्षाध्यक्ष करताना त्यांचे वय आणि अनेक राजकीय मर्यादा सोनिया गांधींनी लक्षात घेतल्या होत्या.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर यांनी अलीकडेच पक्षातील अंतर्गत धुसफुस चव्हाट्यावर आणली आहे. मी राहुलवादी नाही, असे अय्यर म्हणाले. अय्यर यांनी आपण राहुलवादी नाहीत हे सांगण्यास नेमकी हीच वेळ का निवडावी, याचे उत्तर खुद्द अय्यर हेच देऊ शकतील. अय्यर हे माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांच्या निकटवर्तीय वर्तुळातील नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी काहीकाळ केंद्रीय मंत्रिपदही भूषविले आहे. अय्यर यांच्या आधीही काँग्रेसमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी राहुल गांधी यांना पक्षाचे अध्यक्षपद देऊ नका तसेच सर्व सूत्रे त्यांच्याकडे सोपवू नका, अशी मागणी काही वर्षांपूर्वी सोनिया गांधी यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. काँग्रेसला पूर्ण वेळ अध्यक्ष हवा, अशी मागणी या नेत्यांनी सोनिया गांधी यांना पत्राद्वारे केली होती. राहुल गांधी यांच्या नेतेपणाच्या अनेक मर्यादा गेल्या २५-३० वर्षांत वारंवार उघड्या पडल्या आहेत. आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सशक्त पर्याय ठरू शकत नाही, हे लक्षात आल्यावर राहुल गांधींनी केंद्रातील मोदी सरकारविरुद्ध खोटे-नाटे पसरविण्याची मोहीम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर हाती घेतली आहे. गेल्या १२ वर्षांत नोटबंदी, पाकिस्तानवर केलेले सर्जिकल आणि एअर स्ट्राइक, ऑपरेशन सिंदूर, राफेल विमानांची खरेदी, संरक्षण खात्याची अग्निवीर योजना, अशा अनेक बाबतींत राहुल गांधींनी धडधडीत खोटी माहिती पसरवण्याचा प्रयत्न केला. राफेल विमानांच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. राफेल विमान खरेदी व्यवहाराची सर्व कागदपत्रे मागवून आणि ती तपासून या व्यवहारात काहीही गैरव्यवहार झाला नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींचा खोटेपणा उघड करत या व्यवहाराबाबत निर्माण केल्या गेलेल्या सर्व शंका दूर केल्या होत्या. त्यानंतरही युवराज राहुल गांधींनी या व्यवहाराबाबत खोटे बोलणे चालूच ठेवले. त्यामुळे त्यांना सर्वोच्च न्यायालयापुढे माफीनामा सादर करावा लागला होता.

# जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांना मंजुरी! राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

मुंबई - राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये नगरपालिकांप्रमाणे नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय गुरुवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

ग्रामीण विकास विभागाने अलीकडेच १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांमध्ये अध्यक्ष व सभापती निवडीची प्रक्रिया २० मार्चपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्येही नगरपालिकांप्रमाणे नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आला.




निर्णयानुसार, साधारणतः ६० ते ६५ सदस्यसंख्या असलेल्या जिल्हा परिषदांमध्ये पाच नामनिर्देशित सदस्यांना संधी दिली जाणार आहे. ज्या जिल्हा परिषदांची सदस्यसंख्या अधिक आहे, त्या ठिकाणी प्रमाणानुसार नामनिर्देशित सदस्यसंख्या वाढविण्यात येणार आहे. प्रारंभी हा निर्णय १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांमध्ये लागू होईल. पुढील सर्वसाधारण निवडणुकांनंतर उर्वरित जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनाही हा निर्णय लागू केला जाणार आहे.

पंचायत समित्यांच्या बाबतीत मोठ्या समित्यांमध्ये दोन, तर लहान समित्यांमध्ये एक नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात सुमारे ७० पंचायत समित्या अशा आहेत, जिथे प्रत्येकी चार ते पाच निवडून आलेले सदस्य आहेत. अशा ठिकाणी किमान एक नामनिर्देशित सदस्य असावा, अशी माहिती विभागीय अधिकाऱ्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत दिली.नगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या सदस्यांच्या प्रमाणात नामनिर्देशित सदस्य नियुक्त करण्याची जी पद्धत आहे, त्याच धर्तीवर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्येही ही अंमलबजावणी होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींना संधी मिळणार असून प्रशासनिक कामकाज अधिक सक्षम व परिणामकारक होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## वाल्मीक कराडला १ वर्ष जामीन नाहीच- उच्च न्यायालय

नवी दिल्ली : बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला सुप्रीम कोर्टाकडूनही दिलासा मिळू शकला नाही. गुरुवारी सुप्रीम कोर्टाने वाल्मीक कराडचा जामीन अर्ज फेटाळला असून या 'सर्वोच्च' दणक्यामुळे वाल्मीक कराडचा तुरुंगातील आणखी वर्षभरासाठी लांबणार आहे.



डिसेंबर २०२४ मध्ये मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. अत्यंत क्रूरपणे संतोष देशमुखांची हत्या केल्याने संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मीक कराड हा घटनेच्या तीन आठवड्यांनी म्हणजेच ३१ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यात पोलिसांना शरण आला होता. तेव्हापासून वाल्मीक कराड तुरुंगात आहे.गुरुवारी सुप्रीम कोर्टाने वाल्मीक कराडला मोठा दणका दिला. 'वाल्मीक कराडला एक वर्ष जामीन मागता येणार नाही', असे निर्देशचे सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. गुरुवारी सुप्रीम कोर्टात वाल्मीक कराडच्या वतीने शिरीष गुप्ते यांनी बाजू मांडली. 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) आम्हाला लागूच होत नाही. मकोकाबाबत प्राथमिक अर्जात नाव नसल्याने या कायद्यान्वये आमच्यावर कारवाई होऊ शकत नाही', असे कराडच्या वकीलांनी सांगितले.सुप्रीम कोर्टाने यानंतर कराडची बाजू ऐकून घेतली नाही. यानंतर सरकारी वकिलांनी वाल्मीक कराडला जामीन देण्यास विरोध केला. 'कराडचा हा पहिला गुन्हा नाही. कराडवर २० गुन्हे दाखल आहेत. हा २१ वा गुन्हा आहे. त्यामुळे जामीन देता येणार नाही', असे सरकारी वकिलांनी कोर्टात सांगितले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यावर सुप्रीम कोर्टाने कराडचा जामीन अर्ज फेटाळला. तसेच पुढील सुनावणी ट्रायल कोर्ट करेल, असंही सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले.

# अंबाजोगाई शहरात जबरी चोरी करणारे चार आरोपी अटक - स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

अंबाजोगाई(प्रतिनिधी):- शेख ईम्रान दस्तगीर, वय २८ वर्ष, व्यावसाय मिस्त्रीकाम, रा होळ ता. केज यांनी दिनांक ०७/०२/२०२६ रोजी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे तक्रार दिली की, फिर्यादी हा सानिका बिअर बार आडस फाटा येथे थांबलेला असताना त्याला त्याचे मित्राने ऑनलाईन पैसे टाकण्यासाठी सांगीतले परंतु त्याचे कडे ऑनलाईन पैसे नव्हते, त्याने बिअर बार चे बाहेर लोकांकडे विचारपुस करण्याकरीता थांबला असताना बिअर बारच्या समोर अंदाजे १८ ते २० वर्ष वयोगटातील तिघेजन मोटार सायकलवर बसुन आले. व फिर्यादीस मोटार सायकलवर बसवुन तुला ऑनलाईन पैसे टाकतो असे म्हणुन आडस रोडला घेवुन जावुन त्याचेकडील बळजबरीने पैसे व मोबाईल हिसकावुन घेवुन पळुन गेले वगैरे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं ४८ / २०२६ कलम ३०९ (४), ३(५) बी.एन.. एस प्रमाणे दिनांक ०७/०२/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरील दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध सुरु केला होता. दिनांक २६/०२/२०२५ रोजी पोउपनि / सुतळे यांना गुप्तबातमीदार मार्फत माहीती मिळाली की, वरील गुन्हा हा सुमित अरुण गायकवाड व त्याचे साथीदारासह केला असुन ते सध्या अंबाजोगाई येथे असल्याचे मिळालेल्या माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अंबाजोगाई शहर परीसरातुन वरील गुन्हयातील आरोपीना १. सुमित अरुण गायकवाड, वय २० वर्ष, रा पंचशिल नगर अंबाजोगाई, २. विनय गोविंद जगधने, वय १९ वर्ष, रा संभाजीनगर अंबाजोगाई, ३. विश्वजीत विश्वास गंडले, वय १९ वर्ष, रा लाल नगर अंबाजोगाई व ४. शिवम जनक कसबे, वय १९ वर्ष, रा आर्मी कॉलणी अंबाजोगाई यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे गुन्हयासंदर्भाने चौकशी केली असता वर नमुद चार आरोपींनी गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे. वर नमुद आरोपिंकडुन गुन्हयात बळजबरीने चोरुन नेलेला मोबाईल व गुन्हयात वापरलेली दुचाकी मोटार सायकल जप्त करुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर हे करीत आहेत... सदरील कामगिरी श्री नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, रामचंद्र केकाण, गोविंद भताने, सचिन आंधळे, विकी सुरवसे व चालक अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी मिळुन केली आहे.

# राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवारांची निवड

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक मोठी आणि ऐतिहासिक घडामोड समोर आली आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री आणि दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आणि राष्ट्रीय अधिवेशनामध्ये सुनेत्रा पवार यांची। पक्षाच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.

अजित पवार यांच्या निधनामुळे पोरक्या झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता सुनेत्रा पवारांच्या रूपाने नवे आणि खंबीर नेतृत्व मिळाले आहे. या निवडीमुळे पक्षाच्या भविष्यातील वाटचालीची दिशा स्पष्ट झाली असून कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह पाहायला मिळत आहे.



या राष्ट्रीय अधिवेशनादरम्यान पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि खा. प्रफुल्ल पटेल यांनी उपस्थितांना संबोधित केले. अजित दादांच्या आठवणींना उजाळा देताना पटेल अत्यंत भावूक झाले होते. ते म्हणाले,दादांच्या अकाली निधनानंतर राजकीय वर्तुळात अनेक प्रकारचे तर्क-वितर्क लढवले गेले. पक्षाच्या भवितव्याबाबत आणि नेतृत्वाबाबत अनेक कयास लावले जात होते. मात्र, मी पूर्ण जबाबदारीने सांगतो की, पक्षाच्या एकाही नेत्याच्या किंवा कार्यकर्त्याच्या मनात नेतृत्वाबाबत कोणताही मदुसरा विचारफ आला नाही. सुनेत्रा वहिनीच या पदासाठी योग्य आहेत, यावर सर्वांचे एकमत होते.

### कार्याध्यक्षपदी प्रफुल्ल पटेल कायम

नव्या पर्वाची सुरुवात

सुनेत्रा पवार यांनी यापूर्वीच उपमुख्यमंत्री म्हणून प्रशासकीय जबाबदारी स्वीकारली आहे. आता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आल्याने, राष्ट्रवादी काँग्रेसमधील त्यांचे स्थान अधिक भक्कम झाले आहे. आगामी निवडणुका आणि राजकीय पेचप्रसंग हाताळताना सुनेत्रा पवार कशा प्रकारे नेतृत्व करतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अजित दादांचा वारसा पुढे नेत असतानाच, पक्ष संघटनेला अधिक बळकट करण्याचे मोठे आव्हान

## जाहीर प्रगटन

**श्री.एस.एस. बडगुजर सह-दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज ८८/२०२६**
**शिवकन्या विरूध्द निरंक**

**अर्जदार**
१) शिवकन्या भ्र. गोपीचंद इंगळे, वय-६० वर्षे, धंदा-घरकाम रा.सादोळा ता. केज जि.बीड
२) सर्जेराव पि. गोपीचंद इंगळे, वय-४५ वर्षे, धंदा-शेती रा.सादोळा ता. केज जि.बीड
३) शंकर पि. गोपीचंद इंगळे, वय-४० वर्षे, धंदा-शेती रा.सादोळा ता. केज जि.बीड

**मागणी कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायदा १८७२**
वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गोपीचंद मारूती इंगळे रा. सादोळा ता. केज जि. बीड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विधिज्ञ एस. बी. मस्के यांचे मार्फत अर्ज केला आहे. ज्याअर्थी, गोपीचंद मारूती इंगळे रा. सादोळा ता. केज जि. बीड, यांचा मृत्यु दि.११.०५.२०२४ रोजी विलासराव देशमुख गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, लातुर ता. जि.लातुर येथे झाला असुन वरील अर्जदार हे मयताचे वारस आहेत. मयताचे नावावरील दिलेल्या तक्त्यामधील वर्णन केलेल्या बचत खात्यामधील रक्कम मिळणे साठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव | खाते क्र. | रक्कम रू. |
| --- | --- | --- | --- |
| १ | स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा धनेगांव ता.केज जि.बीड | खाते क्रमांक ६२०५३१५०५६६ | १२५९६०.४०/- |

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत गोपीचंद मारूती इंगळे रा. सादोळा ता. केज जि. बीड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/०२/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्क्याने दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/०४/२०२६ आहे.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,केज

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,केज


# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात

# माय मराठीचा जागर!

### मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज- ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते

लातूर (प्रतिनिधी)

ज्यांच्यावर आपल्या मातृभाषेचा खोल प्रभाव आहे, असे लोक यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे आपली मुले व नातवंडे यांना मातृभाषेतील शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते यांनी केले. तसेच दैनंदिन जीवनात मराठीचा वापर करून आपल्या मातृभाषेच्या सन्मानासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ ग्रामीण कथाकार प्रा. सुरेंद्र पाटील, ज्येष्ठ साहित्यिक तथा ग्रामीण कृषी शब्दांचे अभ्यासक प्रा. द. मा. माने, ज्येष्ठ साहित्यिक-कवयित्री तथा बालकथाकार श्रीमती वृषाली पाटील, ज्येष्ठ कथाकार जी. जी. कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी आदी उपस्थित होते.

**जिल्हाधिकारी कार्यालयात अभ्यागतांसाठी ग्रंथदालन**

जिल्हाधिकारी कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील अभ्यागत कक्षात मराठी ग्रंथालय दालन तयार करण्यात आले असून, त्याचे उद्धाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, गणेश पवार, सायली ठाकूर, तहसीलदार संदीप कुलकर्णी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमातून मराठी भाषेचे संवर्धन, वाचन संस्कृती रुजवणे आणि मायबोलीचा गौरव करण्याचा संदेश देण्यात आला. जिल्हा ग्रंथालय संघ लातूर व जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील मराठी ग्रंथालय दालनासाठी ५०० ग्रंथ भेट देण्यात आले.

## तुलसी समूहातर्फे ८ मार्च रोजी भव्य महिला मॅरेथॉनचे आयोजन

### ७ किमी अंतर, प्रथम पारितोषिक १५ हजार

बीड (प्रतिनिधी)

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य 'महिला मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे मान्यवरांच्या हस्ते मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराच्या या स्पर्धेला याच क्रीडांगणावरून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा क्रीडांगणावरच समारोप होणार आहे.

स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली असून १० ते १८ वर्षे तसेच १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना अनुक्रमे रुपये १५,०००, १०,००० व ७,००० अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सर्व सहभागी स्पर्धकांना टी-शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लहान गटासाठी ५० रुपये तर मोठ्या गटासाठी २०० रुपये नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी तसेच पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या इच्छुक मुली व महिलांनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी करून सहभाग निश्चित करावा. अधिक माहितीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा व मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १३/२०२६**
**पहा**

बाळू सोमा राठोड विरूध्द ग्रा.पं.कार्यालय ईट/गंगनाथवाडी
१. बालु सोमा राठोड, रा.ईट ता.जि.बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत रोहीदास बालु राठोड यांचा दिनांक ११/०९/२००७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास ईट/गंगनाथवाडी ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ईट/गंगनाथवाडी ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२६/०२/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०३/२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार बीड**



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १४६/२०२६**
**गजानन पि. रमेश गोडबोले व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड एस. एल. कदम, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सासरकडील नाव-कौशल्या भ्र. रमेश गोडबोले, माहेरकडील नाव-कौशल्या पांडुरंग पंडीत रा. मिरगाव ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २१/०१/२०२६ रोजी मिरगाव ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र.१. गजानन पि. रमेश गोडबोले, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. म्हाळसपिंपळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मिरगाव ता. गेवराई जि.बीड अर्जदार क्र. २. रमेश पाटीलबा गोडबोले, वय ७५ वर्षे, धंदा शेती, घूय स्प५ वर्षे, धंदा शेती, रा. म्हाळसपिंपळगाव ता. गेवराई जि.बीड ह.मु. मिरगाव ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यानी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सासरकडील नाव-कौशल्या भ्र. रमेश गोडबोले, माहेरकडील नाव-कौशल्या पांडुरंग पंडीत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २५/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.
पुढील तारीख - ०६/०४/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई


# ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात

# मधुकरराव वैद्य यांचे व्याख्यान संपन्न

बीड । प्रतिनिधी

ग्रंथ हे जीवनासाठीचे उत्तम मार्गदर्शक असतातच, वाचेल तो वाचेल, हे सत्य आहेच. वाचन चळवळीचे स्वरूप बदलते आहे.. तेही स्वीकारले जाते. वाचनासोबतच ग्रंथाचा अभ्यास, चर्चा, चिंतन हा उपक्रम आपण हाती घेतलेला आहे. त्याअनुषंगानेच ए. एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात बुधवार दि.२५-०२-२०२६ रोजी सायं. ५.३० ते ६.३० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात मधुकरराव वैद्य यांचे ज्ञानेश्वरीवर चिंतन संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन प्रमुख व्याख्याते श्री. मधुकरराव वैद्य, विश्वस्त मंडळाच्या उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट, संचालिका सौ. निलीमाताई पाटंगणकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

यानंतर प्रमुख व्याख्याते श्री. मधुकरराव वैद्य यांनी ज्ञानेश्वरी व्याख्यानमाला या मालेत ३४ वे पुष्प गुंफतांना ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्ययातील १५ ते १६ व्या श्लोकावर विस्तृतपणे निरुपण केले.या कार्यक्रमास कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, संचालक प्रा. दिलीप गांधी, प्रा. विवेक वैद्य, तसेच ह.भ.प. विनायक महाराज पाटंगणकर, रत्नाकरराव धाट, अविनाश पानगांकर, श्रीकांत क्षीरसागर, डॉ. वशिष्ट जाधव, डॉ.पी.के. कुलकर्णी, मुकुंद पाटील, श्रीकिशस जेथलिया, प्रकाश चैतन्य, सौ. स्नेहलता सुधील देशमुख, सौ. मिरा वैद्य, डॉ. मंगेश वालेवाडीकर, श्रीराम देशमुख, पवार अरुण, यांच्यासह वाचक, सभासद, कर्मचारी वृंद आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सदरील कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अमोलकचंदजी सुराणा, उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सदस्य ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांच्यासह कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वतेसाठी ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, किशोर ठोसर, कुमार देशमुख, संतोष जगताप, रमेश जोशी, रामेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३८ दि.१४.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख उजमा शेख अलिज, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शेख उजमा शेख अलिज | स्वतः | १३.०४.२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७२८ दि.०८.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख सायमा अखिल अहमद, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शेख सायमा अखिल अहमद | स्वतः | १८.०२.२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२१४ दि.०७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शाफियोद्दीन ईस्माईल तांबोळी, रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शाफियोद्दीन ईस्माईल तांबोळी | स्वतः | ०१.०१.१९६० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१२१५ दि.०७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **हुमा युसूफ तांबोळी रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | हुमा युसूफ तांबोळी | स्वतः | ११.०७.१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६८४ दि.०७.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **हुसेन हबीब सय्यद, रा.पिठोरी सिरसगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | हुसेन हबीब सय्यद | स्वतः | ०१.०१.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय घनसावंगी**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२५० दि.२७.०२.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शेख शेरू शेख फत्तु, रा.देवडी हादगांव ता.घनसावंगी जि.जालना** यांनी यांच्या **आजी**च्या मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | जानबी मदार शेख | आजी | १९.०३.२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०७६ दि.१४.१०.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **करीम खान अब्दुल्ला खान, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | करीम खान अब्दुल्ला खान | स्वतः | ०१.०१.१९५६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३५ दि.२४.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख मोहम्मद कैफ अखील, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शेख मोहम्मद कैफ अखील | स्वतः | १४.०४.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे ‘मराठी भाषा गौरव दिन’ उत्साहात साजरा

## इंग्रजी शिका, पण मराठी विसरू नका - प्रा. विकास ढोकणे





प्रतिनिधी । बीड

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची ओळख, इतिहासाची साक्ष, संस्कारांची परंपरा आहे. आपण इंग्रजी, हिंदी किंवा इतर भाषा नक्की शिकलो पाहिजे. मात्र आपल्या मराठी भाषेचा सन्मान आणि वापर कधीही कमी होता कामा नये. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा आणि संत गाडगेबाबा यांनी मराठी भाषेतून समाजप्रबोधन केले. ही परंपरा जपणे हीच खरी मराठीची सेवा आहे, असे प्रतिपादन शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे मराठी भाषा गौरव दिन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जय मराठी, जय महाराष्ट्रच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी मराठी भाषेप्रती आपला अभिमान व्यक्त केला. २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त ‘मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त ‘मराठी भाषेचा गौरव आणि साहित्य’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. राहुल खडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआय महाविद्यालयाचे प्राचार्य वाघ उपस्थित होते. विभागप्रमुख एस. आय. शेख, पी. डी. दुधाळ तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रस्तावना प्रा. अजय दुधाळ यांनी केली. मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. आभार प्रा. दुधाळ यांनी मानले.

# तांदळेश्वर विद्यालयाची आरती खोसे व दिव्या जगताप यांचे एन एम एम एस परीक्षेत उज्वल यश



बीड (प्रतिनिधी)

नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगणचे तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेमधील विद्यार्थ्यांनी एन एम एम एस परीक्षेत चांगले यश मिळवले आहे त्यामुळे संस्थेचे सचिव डॉक्टर योगेश जी क्षीरसागर यांनी व संस्था प्रशासनाधिकारी गुट्टे सर व देशमाने सर यांनी अभिनंदन केले आहे

या परीक्षेमध्ये एकूण पाच विद्यार्थी बसले होते त्यामध्ये दोन विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवले आहे यामध्ये दिव्या गोरख जगताप व आरती गोविंद खोसे या विद्यार्थिनींनी आर्थिक दुर्बल घटक राष्ट्रीय स्तरावरील ही परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अंधापुरी घाट व तांदळवाडी घाट या दोन्ही गावातून व पंचक्रोशीतून त्यांच्या अभिनंदन होत आहे.विद्यालयाचे प्राचार्य श्याम डाके सर् व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी या विद्यार्थिनींना अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.




# अँड. राम डोंगरे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा माजलगाव वकील संघाच्या वतीने तिव्र निषेध



माजलगाव (प्रतिनिधी)

बीड येथील अँड राम डोंगरे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज माजलगाव वकील संघाच्या वतीने माजलगाव न्यायालय परिसरात तीव्र निषेध नोंदविण्यात आला.वकिलांवर होणारे वाढते हल्ले ही अत्यंत गंभीर बाब असून न्यायव्यवस्थेच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, असे मत संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले ,संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर वकिलांनी दिवसभर कामकाज बंद ठेवून निषेध व्यक्त केला , तसेच जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभागाने वकिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

यावेळी संघाचे अध्यक्ष, सचिव व अनेक सदस्य उपस्थित होते. या घटनेमुळे वकिलांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा माजलगाव वकील संघाच्या वतीने देण्यात आला आहे .

# केज तालुक्यात जिल्हाधिकाऱ्यांचा दौरा; शासकीय कामकाज व विकास योजनांचा घेतला सखोल आढावा



बीड / प्रतिनिधी

केज तालुक्यात मा. जिल्हाधिकारी,बीड यांनी विविध ठिकाणी भेट देत शासकीय कार्यालये, औद्योगिक आस्थापना तसेच केंद्र शासन पुरस्कृत विकास योजनांच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष पाहणीद्वारे सखोल आढावा घेतला.

दौऱ्यादरम्यान कुंबेफळ (ता. केज) येथील व्यंकटेश्वरा जीनिंग मिल येथे भेट देण्यात आली. येथे कापूस प्रक्रिया, शेतकऱ्यांशी संबंधित बाबी, कामगार व्यवस्थापन तसेच उद्योगातील कार्यपद्धतीची माहिती घेण्यात आली. कृषी व औद्योगिक क्षेत्रातील समन्वय अधिक सक्षम करण्यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

त्यानंतर तहसील कार्यालय केज येथे कर्मचारी, मंडळ अधिकारी तसेच ग्राम महसूल अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत महसूल प्रकरणांचा वेळेत व गुणवत्तापूर्ण निपटारा करणे, नागरिकांना सुलभ व पारदर्शक सेवा देणे, ई-ऑफीस प्रणालीचा प्रभावी वापर तसेच शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर केंद्र शासन पुरस्कृत -चठणढ २.० अभियानांतर्गत नगरपंचायत केज येथे हरित क्षेत्र विकास व तलाव सरोवर पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. प्रकल्पांची सद्यस्थिती, कामांची गुणवत्ता, निधी खर्च तसेच निर्धारित कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

दौऱ्याच्या शेवटी राजीव गांधी तलाव येथे प्रत्यक्ष भेट देऊन हरित क्षेत्र विकास व तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, पाणी साठवण क्षमतेत वाढ तसेच नागरिकांसाठी स्वच्छ व सुरक्षित सार्वजनिक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने कामे नियोजनबद्ध व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या दौऱ्यामुळे केज तालुक्यातील प्रशासकीय कार्यप्रणाली अधिक सक्षम होऊन शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच सर्वांगीण व शाश्वत विकासाला गती मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# पार्थ पवार राज्यसभेवर जाणार!



मुंबईमधील वरळी डोम येथे आज (गुरुवार) झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत आज महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आले. यामध्ये सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवडण्यात आलं. यानंतर पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवलं जाणार असल्याचं जाहीर केलं गेलं.पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रफुल पटेल यांनी या दोन्ही निर्णयांची घोषणा केली.तत्पुर्वी सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर

जबाबादारी स्वीकारत पक्षाला मार्गदर्शन केले. त्यांचे मार्गदर्शन झाल्यानंतर प्रफुल पटेल यांनी पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवले जाणार असल्याचं सर्वांसमोर जाहीर केलं.

# दक्षिण आफ्रिकेचा सुपर-८ मध्ये सलग दुसरा विजय

वेस्ट इंडिजला ९ गड्यांनी हरवले

दक्षिण आफ्रिकेने टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ मध्ये सलग दुसरा सामना जिंकला आहे. गुरुवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात संघाने वेस्ट इंडिजचा ९ विकेट्सने पराभव केला. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी केली.

वेस्ट इंडिजने २० षटकांत ८ विकेट्सच्या मोबदल्यात १७६ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने १६.१ षटकांत १ विकेटच्या मोबदल्यात १७७ धावांचे लक्ष्य गाठले. कर्णधार एडेन मार्करामने नाबाद ८२ आणि रायन रिकेल्टनने ४५ धावा केल्या.

वेस्ट इंडिजकडून रोमारियो शेफर्डने नाबाद ५२ धावा केल्या. तर जेसन होल्डर ४९ धावा काढून बाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने ३ विकेट्स घेतल्या. कागिसो रबाडा आणि कॉर्बिन बॉश यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.

# दिवसाढवळ्या महिलेच्या गळ्यातील दागिना लंपास

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील केरूळ परिसरातदिवसाढवळ्या महिलेच्या गळ्यातील सुमारे १६ ग्रॅम वजनाचा मिनी गंठण दोन अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना बुधवारी (दि. २५) सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला उपचार आटोपून आपल्या गावाकडे परत जात होती. बीड-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील शेरी पुलाजवळ मागून भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीवरील दोन अज्ञात इसमांनी महिलेच्या गळ्यातील १६ ग्रॅमचे मिनी गंठण झडप घालून लंपास केले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे महिलेचा



दुचाकीवरील ताबा सुटला आणि ती नातवासह रस्त्यावर पडली. या अपघातात ती किरकोळ जखमी झाली.

घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत केली. या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर हे पुढील तपास करीत आहेत.

# संजय राऊतांची निर्दोष मुक्तता



शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची कोर्टाने निर्दोष मुक्तता केली आहे. संजय राऊत यांना मानहानीच्या एका जुन्या प्रकरणात आज मुंबई सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी डॉ. मेधा सोमय्या यांनी दाखल केलेल्या अब्रू नुकसानीच्या दाव्यात सत्र न्यायालयाने संजय राऊत यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

यापूर्वी माझगाव न्यायालयाने संजय राऊत यांना १५ दिवसांची कैद आणि दंडाची शिक्षा सुनावली होती. पण आता ती शिक्षा पूर्णपणे रद्द झाली आहे. हे संपूर्ण प्रकरण मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालय बांधकामाशी संबंधित आहे. सोमय्या दाम्पत्याने या कामात १०० कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे, असा आरोप संजय राऊत यांनी केला होता. या आरोपांमुळे आपली आणि आपल्या संस्थेची सामाजिक प्रतिष्ठा मलीन झाली आहे, असा दावा डॉ. मेधा सोमय्या यांनी केला होता. यानंतर त्यांनी कलम ५०० अंतर्गत संजय राऊतांविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला होता. गेल्या अनेक दिवसांपासून सत्र न्यायालयात यावर अंतिम युक्तिवाद सुरू होता. आज निकालाच्या वेळी संजय राऊत, किरीट सोमय्या आणि मेधा सोमय्या हे तिघेही न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित होते. सत्र न्यायलयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर माझगाव कोर्टाचा निकाल बाजूला सारत संजय राऊत यांची निर्दोष मुक्तता केली.



# शिक्षकेतर कर्मचारी होणार शिक्षक, मुख्याध्यापक; थेट नियुक्ती

अनेक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यापुढे शिक्षक, मुख्याध्यापक पदावर नियुक्ती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षकेतर कर्मचारी यांना पात्रता पूर्ण केल्यावर शिक्षक पदावर नियुक्ती हवी असल्यास त्यांना पुन्हा शिक्षण सेवकांचा कालावधी पूर्ण करावा लागणार नाही, असे या निर्णयात म्हटले आहे. शिक्षक होण्यास पात्र असलेल्या अनेक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या या निर्णयाची अंमलबजावणी आता जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी करणार आहेत. या निर्णयाचा राज्यातील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे.

नियमित शासकीय सवेतील अथवा ज्याचे वेतन अनुदान सरकारमार्फत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत देण्यात येते अशा नियमित, निमशासकीय सेवेतील व्यक्ती ज्यावेळी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच या विभागाच्या अधिपत्याखालील १०० टक्के अनुदानित शाळांमधील कोणत्याही स्तरातील व कोणत्याही माध्यमातील शिक्षण सेवक पदावर नियमानुसार नियुक्त होतो, त्यावेळी त्याची आहे तिच वेतननिश्चिती करण्यास सरकारने मान्यता दिली आहे.

शिक्षकेतर कर्मचारी यांना पात्रता पूर्ण केल्यावर शिक्षक पदावर नियुक्ती हवी असल्यास त्यांना पुन्हा शिक्षण सेवकांचा कालावधी पूर्ण करावा लागणार नाही.त्यामुळे या निर्णयाचा अनेकांना फायदा होणार आहे. खाजगी शाळा ज्यात प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालये/शासकीय विद्यानिकेतने व सैनिकी शाळा या पैकी कोणत्याही शाळेत कर्मचारी सेवक असल्यास त्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# बीड जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियान शंभर टक्के राबवा - जिल्हाधिकारी

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हयातील सर्व महसूल मंडळांमध्ये महसूल सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा १' राबवण्यात येणार आहे. यासंदर्भात दि.२६.०२.२०२६ रोजी सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार आणि महसूल मंडळ अधिकारी व इतर विभागांची जिल्हास्तरीय आढावा बैठक घेवून हे अभियान १०० टक्के यशस्वी करण्याचे निर्देश दिले जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) यांनी दिले आहेत.

हे अभियान ७ मार्च २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत राबवले जाणार आहे. सामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न एकाच ठिकाणी निकाली काढणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. 'एका दिवसात सेवा वितरण' या संकल्पनेवर हे अभियान आधारित असेल.

या शिबिरांमध्ये नागरिकांना खालीप्रमाणे महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. दाखले वाटपः विद्यार्थ्यांसाठी शाळास्तरावर कॅम्प घेऊन विविध प्रकारचे दाखले दिले जातील, लोकसेवा हक्क कायद्यातील तरतुदीनुसार प्रमाणपत्र अर्ज स्वीकारणे तसेच पुर्वी प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने प्राणपत्र वितरीत करणे

७/१२ अद्ययावत करणेः प्रलंबित व विवादग्रस्त फेरफार निकाली काढणे, जिवंत ७/१२', मोहिमेअंतर्गत अद्ययावत ७/१२ चे वाटप आणि फेरफार नोंदी दुरुस्त केल्या जातील.

जमीन संबंधित प्रकरणेः भोगवटादार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये परावर्तित करणे, अकृषिक सुधारणा कायद्याबाबत मार्गदर्शन करणे, तुकडेबंदी कायद्यांतर्गत फेरफार आणि अकृषिक (छ-) परवानगी नोंदी अद्ययावत केल्या जातील.सामाजिक अर्थसहाय्यः विविध शासकीय योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशांचे वाटप करण्यात येईल. डिजिटल ७/१२: महाभूमी पोर्टलवरील टठ उेवश डिजिटल ७/१२ ला पूर्ण कायदेशीर वैधता असल्याबाबत जनजागृती करावी.कमी-जास्त पत्रकेः भूसंपादन व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणांत 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे बाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.




इतर सेवा: एरीशेष उेळपस ईीळ-पर्शीी सुधारणा व नागरी सुविधा, समाधान शिबीरामध्ये एक खीडकी सुविधा अंतर्गत आधार नोंदणी दुरुस्ती, ई-मोजणी, ॲग्रीस्टैंक, पी.एम. किसान व तक्रार निवारण कक्ष (जनता दरबार)१८ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत अभियानाची पूर्वतयारी करण्यात येत आहे. यामध्ये वंचित लाभार्थ्यांच्या याद्या तयार करणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि गावोगावी दवंडी व सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

करीता 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानाअंतर्गत वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, शेतकरी आणि विद्यार्थी यांनी आपल्या जवळच्या महसूल मंडळ स्तरावरील शिबिराची माहिती घेऊन, या अभियानाचा जास्तीत जास्त सेवांचा लाभ घ्यावा घेणेबाबत आवाहन विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड, यांनी केले आहे.

# मॉडर्न महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**भाषा व्यक्तीच्या प्रदेशाची ओळख दर्शविते : प्राचार्य डॉ. सानप**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)

भाषा शिवाय संवाद आणि संवादाशिवाय भाषाला पूर्णत्व प्राप्त होत नाही. भाषा आणि संवाद एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भाषा संवादाची जननी आहे. भाषा व्यक्तीच्या प्रदेशाची ओळख दर्शविते असे मत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजी नगर येथील मॉडर्न महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ.सानप हे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र भगत विभाग प्रमुख प्रा हर्षद वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती. यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ.सानप म्हणाले की, मराठी विकासात ज्या ज्ञात अज्ञात थोर महात्म्यांनी, साहित्यीकांनी, अभ्यासकांनी विचारवंतांनी योगदान दिले त्यांचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी भाषांवर प्रभुत्व मिळवून आपले



व्यक्तिमत्त्व प्रभावी घडवावे असे आवाहन करुन भाषा विकासाची एक महत्वपूर्ण पायरी आहे.असेही डॉ सानप यांनी म्हटले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भगत यांनी केले. यावेळी प्रा प्रज्ञा किवंडे प्रा उत्कर्षा वाघमारे प्रा नबीया खान यांचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.शेवटी प्रा प्रवीण पावहारे यांनी आभार मानले..

# रासेयो विशेष शिबीरात पशुचिकित्सा व उद्बोधन व्याख्यान संपन्न



मुक्रामाबाद (प्रतिनिधी)

दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रामाबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबिर संपन्न होत आहे. यात सकाळच्या सत्रात पशुचिकित्सा करण्यात आली. पशुचिकित्सक म्हणून डॉ.जुनेद शेख (पशुवैद्यकीय अधिकारी गोजेगाव) व त्यांचे सहकारी बल्लेवाड पी.पी., गायकवाड आर.जी., देमगुंडे बी.जी. यांनी गावातील सर्व प्रकारच्या पाळीव प्राण्यांची तपासणी करून लसीकरण केले. यात जवळपास १५० पाळीव प्राण्यांची तपासणी यशस्वीरित्या पूर्ण केले. यात गावातील नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

तसेच दुपारी उद्बोधन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचे अध्यक्ष म्हणून सह कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.बी.मादळे उपस्थित होते. उद्बोधन पर व्याख्यानात प्रा.डॉ.जे.पी.काळे यांनी 'राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व', डॉ.डी.एम.काळे यांनी 'योगाचे महत्व', डॉ.एम.एम.सय्यद यांनी 'एस.आर.टी.शेती तंत्रज्ञान', तसेच डॉ.बी.पी. खराबे यांनी 'निरंतर विकास व व्यसनमुक्ती आर्थिक साक्षरता काळाची गरज' या विषयावर उपस्थितांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. मा.म.गायकवाड यांनी केले तर आभार डॉ.एस.एल.सकनुरे यांनी मानले. या कार्यक्रमास सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आर.बी.बाविस्कर, विद्यार्थी बेंजलवार यशपाल,अंकुश पारसे,रोशन सोनकांबळे, सुरज भिंगोले, मनीषा सूर्यवंशी, ऐश्वर्या, बालाजी सादगिरे व तसेच जि.प.शाळेचे मुख्याध्यापक धरणे सर व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.सुरेश आण्णा धस यांची लाडकी कन्या मैथिलीचा वाढदिवस उत्साहात

**सौशल मिडियावर शुभेच्छांचा व आशिर्वादांचा वर्षाव**

आष्टी - (राजेंद्र लाड) लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस यांची लाडकी लेक मैथिली हिचा वाढदिवस अत्यंत आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आ. सुरेश धस यांच्या फेसबुक पेजवर शुभेच्छांची व आर्शिवादांची बरसात झालेली आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी फेसबुक पेजवर मैथिलीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आशिर्वाद दिले.

वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक विशेष क्षण असतो. धस कुटुंबासाठीही हा दिवस अत्यंत भावनिक आणि आनंदाचा ठरला. आ. सुरेश आण्णा धस यांनी आपल्या कन्येला शुभेच्छा देताना अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत भावना व्यक्त केल्या. माझी लाडकी लेक मैथिली, तुला दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा! तुझं आयुष्य आनंद, यश, प्रेम आणि उत्तम आरोग्याने सदैव फुलत राहो. तुझ्या प्रत्येक स्वप्नाला सुंदर पंख लाभोत आणि तू आकाशाएवढी उंच भरारी घे, असे म्हणत त्यांनी कन्येप्रती असलेले अपार प्रेम व्यक्त केले. त्यांच्या या फेसबुक पेजवरील शुभेच्छा संदेशाने कार्यकर्त्यांमध्ये व स्नेही जणांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले.

मैथिली ही लहान वयातच सुसंस्कृत, अभ्यासू आणि नम्र स्वभावामुळे सर्वांच्या मनात घर करून आहे. सामाजिक जाणीव आणि जनसेवेची प्रेरणा तिला कुटुंबातूनच लाभली आहे. धस कुटुंबाचे सामाजिक कार्य आणि लोकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते याचा प्रभाव तिच्या व्यक्तिमत्त्वातही जाणवतो. शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करत असताना ती विविध उपक्रमांत उत्साहाने सहभाग घेत असल्याचे तिच्या शिक्षकांनी सांगितले.

वाढदिवसानिमित्त साधेपणाने पण उत्साहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुटुंबीयांनी औक्षण करून तिचे औचित्य



केले. आ. सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांनी व स्नेही जणांनी फेसबुक पेजवर शुभेच्छा संदेश देत मैथिलीच्या आयुष्यात यश, आनंद आणि उत्तम आरोग्य नांदो, अशा सदिच्छा व्यक्त केलेल्या आहेत.

तसेच दिवसभर अनेक कार्यकर्त्यांनी सोशल मिडियावरूनही शुभेच्छांचा वर्षाव केला. मैथिलीने शिक्षण आणि संस्कारांच्या जोरावर भविष्यात समाजासाठी आदर्श कार्य करावे, अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. काहींनी तिला भविष्यात उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत यश संपादन करण्यासाठी प्रेरणा दिली. धस कुटुंबीयांनी या प्रसंगी सर्व शुभेच्छुकांचे मनःपूर्वक आभार मानले. वाढदिवसाच्या निमित्ताने आनंद, समाधान आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करत कुटुंबाने सर्वांच्या प्रेमाला प्रतिसाद दिला. मैथिलीच्या वाढदिवसानिमित्त परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. भविष्यात ती आपल्या कर्तृत्व, संस्कार आणि मेहनतीच्या बळावर कुटुंबाचे तसेच समाजाचे नाव उज्ज्वल करेल, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

# लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालय अग्रेसर; २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र, सत्कार समारंभ उत्साहात

लिंबागणेश (प्रतिनिधी)

भारत सरकारतर्फे घेण्यात येणाऱ्या छरींळेपरश्र चशरपी-लींी-चशीळीं डलहेश्रीीहळि (छचचड) परीक्षेच्या निकालात बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील तब्बल २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून विद्यालयाने तालुक्यात आपला ठसा उमटवला आहे.

छचचड ही परीक्षा आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याच्या उद्देशाने घेतली जाते. ही परीक्षा इयत्ता ८ वीतील विद्यार्थ्यांसाठी असते. परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वी दरम्यान दरवर्षी १२,००० म्हणजेच दरमहा १,००० शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी मोठा आधार ठरते.

या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण होते, आत्मविश्वास वाढतो आणि उज्ज्वल भविष्याची प्रेरणा मिळते. तसेच ही परीक्षा



विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि शैक्षणिक क्षमता तपासणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाते.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी रोजी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा गौरव करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच बालासाहेब जाधव, डॉ. गणेश ढवळे, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक अंगद हावळे व इतर सहशिक्षक उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या यशासाठी दादासाहेब सुपेकर, राहुल रसाळ, गणेश आजबे, गणेश घरत आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यालयाच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

मुक्रमाबाद (प्रतिनिधी)

स्वामी विवेकानंद महाविद्यालय,मुक्रमाबाद येथे आज दि. २७/०२/२०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यालय प्रमुख श्री. संतोष पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डा. विवेक इनामदार, श्री चंद्रकांत पाटील हे होते. या कार्यक्रमात प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डा. बालाजी खराबे यांनी केले. तसेच त्यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करून दिला. तर डा. एकनाथ भिंगोले यांनी मराठी भाषा गौरव दिन या विषयी सखोल मार्गदर्शन केले . प्राचार्य डॉ विवेक इनामदार यांनी कुसुमाग्रज ऊर्फ वि.वा. शिरवाडकर यांच्या विषयी सखोल मार्गदर्शन केले . तसेच या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते . कार्यक्रमाच्या शेवटी डा. बालाजी खराबे यांनी आभार व्यक्त केले.

# गुंडोपंत दापका येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तात्काळ सुरू करण्यात यावे



मुक्रमाबाद/प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील दापका गुंडोपंत येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत पूर्णतः बांधून तयार असून सदर आरोग्य केंद्र अद्याप कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना किरकोळ आजारांपासून ते आपत्कालीन परिस्थितीतही पंधरा ते वीस किलोमीटर दूरवर जाऊन उपचार घ्यावे लागत आहेत. येथील प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित झाल्यास दापका गुंडोपंत, हाळणी, हातराळ, तग्याळ, कलंबर आदी गावांतील ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लागणार असून कोट्यावधी रुपये खर्चून बांधण्यात आलेली इमारत सध्या कार्यान्वित न झाल्यामुळे धुळखात पडून आहे.

दापका गुंडोपंत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्वरित वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तात्काळ सुरू करण्यात यावी जेणेकरून दापका गुंडोपंत सह परिसरातील गावातील नागरिकांना चांगली आरोग्य सुविधा उपलब्ध होईल अशी मागणी करणारे निवेदन तालुका आरोग्य अधिकारी यांना देण्यात आले आहे. हे प्राथमिक आरोग्य केंद्र तात्काळ सुरू करण्यात यावे अशी मागणी सीताराम पंढरीनाथ देबडवार, प्रकाश दापकेकर यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

# जिल्हा परिषद देविगव्हाण शाळेचा सांस्कृतिक सोहळा उत्साहात संपन्न

आष्टी - (प्रतिनिधी)

जिल्हा परिषद देविगव्हाण शाळेचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शाळेच्या प्रांगणात रंगतदार सादरीकरणे, उपस्थित मान्यवरांची उपस्थिती आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर स्वागत गीत व गणेश वंदनेने सांस्कृतिक पर्वाची मंगलमय सुरुवात झाली.

या प्रसंगी जामगाव-देविगव्हाण ग्रामपंचायतचे युवा सरपंच राधेश्याम भैय्या धस, मा. सरपंच अमोल जगदाळे, अनिल जगदाळे, अशोक शिंदे, वस्ताद राहूल भाऊ जगदाळे,



संतोष दाणी, संतोष बनकर, दीपक सोले, बाळासाहेब बनसोडे, अशोक धोंडे, शेषराव तोतरे, जमदाडे सर, चंद्रकांत तोतरे, श्रीमती शिला कातखडे, श्रीमती मायावती नाळे, श्रीमती मनिषा जिवडे, श्रीमती जयश्री झगडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा श्रीमती अंजना शिवाजी पुलावळे, माजी त्रिदल सैनिक व आष्टी शहराध्यक्ष श्रीराम माने, झगडे सर, गर्जे सर तसेच ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी व जय बजरंग तरुण मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. लावणी, शेतकरी गीत, लोककला सादरीकरण, सिनेमा गीतांवरील नृत्य तसेच गुरुजींचे विनोदी नाटक या सादरीकरणांना विशेष दाद मिळाली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण व सुसंगत सादरीकरणामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली.

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप दाणी यांनी मार्गदर्शन केले, तर श्रीमती कुंदा धोंडे यांनी विशेष परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. कार्यक्रमादरम्यान गावातील गुणवंतांचा सन्मानही करण्यात आला. दीपक सुखदेव माने यांची महावितरणमध्ये विद्युत सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रगती गौतम जगदाळे हिची सेपक टकरा या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल तिचा विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आदर्श शिक्षक विकास धस यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक दिलीप दाणी यांनी मानले. याप्रसंगी जय बजरंग तरुण मंडळाच्या वतीने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. एकूणच, जिल्हा परिषद देविगव्हाण शाळेचा हा सांस्कृतिक सोहळा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा आणि ग्रामस्थांना एकत्र आणणारा संस्मरणीय ठरला.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य–राजशक्ती
SAMARTH RAJYOG


# चांदापुर येथे ७ मार्च शनिवार रोजी १२ व्या धम्म परिषदेचे आयोजन

## धम्म उपासकांनी सहभागी व्हावे – तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण यांचे आवाहन


परळी (प्रतिनिधी)

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा – क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी बाराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेचे उद्घाटन अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या हस्ते होत असलेल्या धम्म परिषदेत तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू करूणानंद महाथेरो (संचालक, द ग्रेट हॅपिनेस चॅनल, छत्रपती संभाजीनगर), पुज्य भिक्खू महाविरो (काळेगाव, अहमदपुर), पुज्य भिक्खू पय्यानंद (लातूर) पुज्य भिक्खू धम्मशील (हिंगोली, बीड) आणि पुज्य भिक्खू धम्मसार (किल्लारी) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. जास्तीत जास्त उपासकांनी लाभ घ्यावा असे आवाहन धम्म परिषदेचे कार्यवाह ॲड.अनंतराव जगतकर यांनी केले आहे.

तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण, चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे बाराव्या बौद्ध धम्म परिषदेत प्रारंभी सकाळी ९ वाजता पंचरंगी धम्म ध्वजारोहण होईल. तर परिषदेची सुरूवात सकाळी ११ वाजता होईल. या परिषदेस भिक्खु करूणानंद महाथेरो, पु.भिक्खु महावीरो, पु.भिक्खु पय्यानंद, पु.भिक्खु धम्मशील, पु.भिक्खु धम्मसार यांचे बहुमोल धम्ममार्गदर्शन लाभणार आहे. त्यांच्या प्रवचनातून धम्म, समता, बंधुता आणि करूणेचा संदेश समाजात अधिक दृढ होणार आहे. या धम्म परिषदेत ना.संजय सिरसाट (मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्रालय, मुंबई.), आमदार धनंजय मुंडे (परळी विधानसभा मतदारसंघ), ना.संजय बनसोडे (मंत्री तथा आमदार, उदगीर विधानसभा मतदारसंघ), संजय दौंड (माजी विधान परिषद सदस्य), ॲड.अनंतराव जगतकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तर यावेळी डी.आर.नरसिंगे (लातूर), सतिश बनसोडे सह.दुय्यम निबंधक, सेलू परभणी), डॉ.डी.टी.गायकवाड (पुणे), ले.कर्नल डॉ.एम.एच.कांबळे (अंबाजोगाई), डॉ.राजेश इंगोले (सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ), संग्राम गित्ते (सरपंच, चांदापूर), सौ.शाहू विजय राठोड (सरपंच, वसंतनगर तांडा), प्रा.डॉ मधुकर खळगे


पु. डॉ. भदन्त उपगुप्त महाथेरो,पुर्णा (कार्याध्यक्ष, अ.भा.भिक्खू संघ)


भिक्खू करुणानंद महाथेरो (संचालक, द ग्रेट हॅपीनेस चॅनल छ.संभाजीनगर)


पु. भिक्खु महावीरो, काळेगाव,अहमदपूर


पु. भिक्खु पय्यानंद लातूर


पु. भिक्खु धम्मशील, हिंगोली/बीड


पु.भिक्खू धम्मसार किल्लारी

(प्राचार्य, कृषी महाविद्यालय), आनंद तुपसमुद्रे (बौद्धाचार्य, परळी वै.), मिलिंद नरबागे (परळी वै.), श्रावण बनसोडे (बोधेगाव), महादेव बनसोडे (नागापूर), आनंद वाघमारे (समाजभूषण, पट्टीवडगाव), प्रशांत गित्ते (चांदापूर), सुरेश मिसाळ (घाटनांदूर), संतोष रोडे (उपमुख्याधिकारी, न.प.परळी वै.) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती परिषदेला लाभणार आहे. या प्रसंगी सरोजाताई गौतम डावरे, अर्चनाताई महेंद्र रोडे, नितीन नामदेव रोडे, महादेव नागनाथ रोडे, कविताताई अनंत इंगळे, कार्तिक भाऊसाहेब कांबळे तसेच परळी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक – नगरसेविका यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. ज्या उपासकांना धम्म परीषदेला उपस्थित रहावयाचे आहे. त्या धम्म उपासकांनी पांढरे वस्त्र परिधान करूनच धम्म परिषदेत सहभागी व्हावे तसेच वसंतनगर तांडा, चांदापूर (ता.परळी वैजेनाथ) या ठिकाणी धम्म परिषदेस येताना पुस – नंदागौळ – वसंतनगर तांडा ते बौद्ध विहार व परळी वैजनाथ – वसंतनगर तांडा ते बौद्ध विहार मार्गेच यावे. असे आवाहन संयोजन समितीने केले आहे. धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै.,जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, प्रा.डॉ.विनोद जगतकर, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे, दत्ता सरवदे, निलकांत हजारे, अर्जुन काळे, प्रा.बालाजी जगतकर, सचिन रणखांबे, व्यंकट वाघमारे, डॉ.बबन मस्के, मनिषा पांडुरंग पाखरे, समाधान तरकसे, चंद्रकांत बनसोडे, सुभाष ताटे, प्रज्ञा इंगोले, वर्षा गायकवाड, मंजुश्री मधुकर कांबळे, राजीव हजारे, पंकज भटकर, मिलिंद शिंदे, सुभाष वाघमारे, राज जगतकर आकाश वेडे हे प्रयत्न करीत आहेत. बारावी बौद्ध धम्म परिषद ही केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक जागृती, समता आणि बौद्ध धम्माच्या तत्वज्ञानाचा प्रसार करणारा प्रेरणादायी सोहळा ठरणार आहे. ही बौद्ध धम्म परिषद अत्यंत भव्य आणि प्रेरणादायी स्वरूपात आयोजित करण्यात आलेली आहे. संपूर्ण परिसर धम्ममय वातावरणाने नटणार असून हजारो धम्मप्रेमी उपस्थित राहण्याची शक्यता आहे. तरी या ऐतिहासिक बौध्द धम्म परिषदेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास या विभागातील बौद्ध उपासकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री.चंद्रकांत लोखंडे यांचा आज सेवापूर्ती कृतज्ञता समारंभ



आष्टी – (राजेंद्र लाड)

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, खिळद ता. आष्टी, जि. बीड येथील मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत ज्ञानदेव लोखंडे यांच्या गौरवपूर्ण शैक्षणिक सेवेला मानाचा मुजरा देण्यासाठी सेवापूर्ती कृतज्ञता समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा समारंभ आज शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, खिळद येथे संपन्न होणार आहे.

श्री. लोखंडे यांनी आपल्या कार्यकाळात शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्यांची जोपासना, शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये वाढ तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून शाळेचा लौकिक उंचावला आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे शाळेला विशेष ओळख मिळाली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ग्रामस्थ, शिक्षकवर्ग, शिक्षणप्रेमी व मान्यवर यांच्या उपस्थितीत हा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खिळद येथील सरपंच सौ. तुळसाबाई आजीनाथ गर्जे या राहणार आहेत. प्रमुख सन्माननीय अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे साहेब, शिक्षण विस्तारअधिकारी सौ. सिमाताई काळे मॅडम तसेच सुरेश पवार (मा. शि.वि.अ. पं.स. आष्टी) यांची उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय प्रमुख पाहुणे म्हणून मारुती पठाडे (अध्यक्ष स्वा.वि.शि.प. कडा), अशोक लटपटे (उपाध्यक्ष स्वा.वि.शि.प. कडा) व महेश दादा शिंदे (मानद सचिव स्वा.वि.शि.प. कडा) उपस्थित राहणार आहेत. तसेच सर्व संचालक, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था कडा व सर्व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमस्थळी शाळेचे केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, केंद्रातील सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समारंभात श्री. लोखंडे यांच्या कार्याचा आढावा, मान्यवरांची मनोगते, सत्कार व स्मृतिचिन्ह प्रदान असा विविध कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संस्कार व स्पर्धात्मकता निर्माण करण्यासाठी राबवलेले उपक्रम याबद्दल समाजमनातून त्यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे. हा कृतज्ञता समारंभ श्री. लोखंडे यांच्या कार्याचा गौरव करणारा आणि शिक्षकवर्गासाठी प्रेरणादायी ठरणारा सोहळा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# आष्टीत खाजगी क्लासेसवर प्रशासनाचा बडगा नियमभंग करणाऱ्या शिक्षकांवर कारवाईचा इशारा

आष्टी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात वाढत्या खाजगी शिकवणी प्रकारांवर प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. शासकीय व जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांनी कोणत्याही परिस्थितीत खाजगी क्लासेस चालवू नयेत, असा स्पष्ट इशारा गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांनी दिला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

तालुक्यातील काही भागांत शाळेच्या वेळेनंतर किंवा सुट्टीच्या दिवशी काही शिक्षकांकडून खाजगी शिकवणी वर्ग घेतले जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. विशेष म्हणजे काही शिक्षकांच्या घराबाहेर विद्यार्थ्यांच्या सायकली व वाहनांची मोठी गर्दी दिसत असल्याचेही निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांनी नागरिकांनाही आवाहन करत स्पष्ट शब्दांत सांगितले की, कोणत्याही शिक्षकांच्या घराबाहेर शिकवणीसाठी विद्यार्थ्यांची गर्दी दिसल्यास संबंधितांचे फोटो काढून कार्यालयाकडे पाठवावेत. चौकशीत नियमभंग सिद्ध झाल्यास कठोर कारवाई केली जाईल.

शिक्षकांनी आपले संपूर्ण लक्ष शाळेतील अध्यापनावर केंद्रित करणे अपेक्षित असताना काही शिक्षक खाजगी क्लासेसकडे वळत असल्याने शाळांमधील अध्यापनाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची भावना पालक व नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. शासनाकडून विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शिष्यवृत्ती तसेच विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असताना शिक्षकांनी खाजगी



शिकवणीच्या माध्यमातून आर्थिक लाभ घेणे हे शैक्षणिक तत्त्वांना धरून नसल्याचे प्रशासनाचे मत आहे. तालुक्यातील अनेक खाजगी शाळांमध्ये ६० ते १०० टक्के अनुदानावर असणारे शिक्षक काम करत आहेत. अशा परिस्थितीत शिक्षकांनी खाजगी शिकवणी वर्ग चालवणे हे सेवा नियमांचे उल्लंघन ठरू शकते. यापुढे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष पथके नियुक्त केली जाणार असून अचानक तपासण्या देखील केल्या जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

दरम्यान, काही पालकांनी प्रशासनाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून विद्यार्थ्यांना शाळेतच दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडू नये आणि सर्वांना समान संधी मिळावी, यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे मतही नागरिकांनी मांडले. गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांनी सर्व मुख्याध्यापकांना स्पष्ट सूचना देत शिक्षकांनी सेवा नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे. प्रशासनाच्या या कडक भूमिकेमुळे तालुक्यातील खाजगी शिकवणी व्यवसायावर निश्चितच परिणाम होणार असून शिक्षण क्षेत्रात शिस्त व पारदर्शकता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# पसायदानाचा वारसा जपणारे विधाते कुटुंब प्राणीप्रेमातून दिला संवेदनशीलतेचा संदेश




आष्टी – (प्रतिनिधी) संत ज्ञानेश्वर यांनी पसायदानातून विश्वातील सर्व प्राणिमात्रांविषयी दया, करुणा आणि कल्याणाची भावना व्यक्त केली. प्रत्येक जीवाला जगण्याचा अधिकार आहे हा त्यांचा संदेश आजही समाजाला दिशा देणारा आहे. याच विचारांचा वसा जपत विधाते कुटुंबीयांनी प्राणीप्रेमाचा एक आदर्श घालून दिला आहे.

माणसांशी आपुलकीने वागणाऱ्या या कुटुंबाने आपल्या घरातील पाळीव श्वानालाही कुटुंबातील सदस्याप्रमाणेच स्नेह दिला आहे. प्राचार्य डॉ. हरिदास विधाते आणि त्यांचे धाकटे बंधू प्रा. शिवदास विधाते यांची श्वानावरील माया व संवेदनशीलता सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे.

गुरुवारी घरी निवांत क्षणी एक हृद्य प्रसंग पाहायला मिळाला. प्रा. शिवदास विधाते यांनी आपला हात पुढे करत प्रेमाने गुड डेअशी साद घातली असता, त्यांच्या लाडक्या श्वानाने क्षणाचाही विलंब न लावता आपला पंजा त्यांच्या हातात ठेवला. जणू काही तो आपल्या मालकाला गुड मॉर्निंग म्हणत अभिवादन करत होता. मालक आणि श्वानातील हा संवाद केवळ खेळकर नव्हता, तर त्यांच्यातील अतूट जिव्हाळ्याचे प्रतीक होता. मुक्या प्राण्यांनाही माया, शिस्त आणि संवादाची भाषा शिकवता येते, याचे हे सुंदर उदाहरण आहे. विधाते कुटुंबाने श्वानाला दिलेले संस्कार आणि प्रेम त्यांच्या संवेदनशीलतेची साक्ष देतात. अनेक पिढ्यांपासून शेती, उद्योग, व्यवसाय आणि नोकरी या विविध क्षेत्रांत कार्यरत असताना या कुटुंबाने आपुलकी, स्नेह आणि जिव्हाळा ही मूल्ये जपली आहेत.

आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागात शेती करत कष्टमय जीवन जगण्याची विधाते कुटुंबाची परंपरा आहे. बदलत्या काळानुसार त्यांनी उच्च शिक्षण घेत शिक्षण क्षेत्रातही आपला ठसा उमटवला. ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबनाचा मंत्र देणारे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्रा. शिवदास विधाते आणि प्रा. आर. जी. विधाते यांनी आपल्या वाघ्या नावाच्या पाळीव श्वानालाही कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपले आहे. पसायदानात व्यक्त झालेल्या सर्वांप्रती दयाभावाचा संदेश विधाते कुटुंबाच्या कृतीतून प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो. त्यांच्या या प्राणीप्रेमातून समाजासमोर संवेदनशीलतेचा आणि सहजीवनाचा आदर्श उभा राहत आहे.

# अंबडमध्ये वाळू माफियांवर महसूलचा घणाघात;गोंदी पोलीस ठाण्यात दोघावर गुन्हा

अंबड (प्रतिनिधी)

तालुक्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर महसूल विभागाने मध्यरात्री धडक कारवाई करत वाळू माफियांच्या मुसक्या आवळल्या.मौजे हसनापूर शिवारातील गल्हाटी नदीपात्रातून बेकायदेशीररीत्या वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गोंदी पोलीस ठाणे येथे ऋखठ क्र. ००५२/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

मध्यरात्रीची छापा कारवाई

दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११.४५ वाजण्याच्या सुमारास मंडळ अधिकारी व्ही. ए. राजपूत यांच्या नेतृत्वाखाली तलाठी विश्वास ढवळे सजा गोंदी,मंडळ अधिकारी कृष्णा येडके, सुशांत लाटकर, मनीष जिरेकर आणि गणेश साळे यांचे पथक हसनापूर शिवारात गस्त घालत होते.

गल्हाटी नदीपात्रात वाळूने भरलेले दोन ट्रॅक्टर आढळताच पथकाने कारवाईचा बडगा उगारला. महसूल पथक पाहताच चालकांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी विनाक्रमांकाचा लाल रंगाचा स्वराज कंपनीचा ७४४ मॉडेल ट्रॅक्टर चेसिस क्र. चइछ–ण५३–उगउङ१०७०५ नाल्यात घसरून पडला. दोन्ही ट्रॅक्टर

अंबडमध्ये वाळू माफियांचे धाबे दणाणले; महसूल विभागाचा मोठा घणाघात!




जप्त करण्यात आले.

२० ब्रास वाळूचे अवैध उत्खनन उघड

घटनास्थळी चौकशीअंती आरोपी शरद दयानंद नरवडे व सचिन गणेश सोळुंके दोघे रा. गोंदी ता.अंबड हे अवैध वाळू उपशामागे असल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी अंदाजे २० ब्रास वाळूचे बेकायदेशीर उत्खनन केल्याचे उघड झाले आहे.

कठोर कलमान्वये गुन्हा

मा. तहसीलदार श्री. विजय चव्हाण यांच्या निर्देशानुसार तलाठी विश्वास भगवान ढवळे यांच्या फिर्यादीवरून दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहिता (इछड २०२३) कलम ३०३(२), ६१(२), ३२९, ३३०, २२३, ३(५) तसेच खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम १९५७ चे कलम ४ व २१, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४८(७) व (८) आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

प्रशासनाचा कडक इशारा

अंबडचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन किंवा वाहतूक अजिबात सहन केली जाणार नाही. यापुढेही असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर थेट फौजदारी व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. अवैध वाळू माफियांविरुद्धची मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही धडक कारवाई जिल्हाधिकारी असिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ व उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तहसीलदार विजय चव्हाण, मंडळ अधिकारी राजपूत व येडके यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली. अंबड तालुक्यातील नैसर्गिक संपत्तीची लूट थांबवण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून वाळू माफियांना स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.कायद्याचा फास आता आवळला जाणारच

# जि.प. शाळा माळीवाडी चा एनएमएमएसमध्ये झंझावाती यश

## विद्यार्थ्यांच्या दमदार कामगिरीने गावाचा शैक्षणिक मान उंचावला




जामखेड (प्रतिनिधी)

राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती अर्थात परीक्षेत जि.प. शाळा माळीवाडी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेच्या गुणवत्तेचा झेंडा रोवला आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवत गावाच्या शैक्षणिक परंपरेला नवे बळ दिले आहे.

गुणवंतांची चमकदार कामगिरी

या परीक्षेत कल्याणी गणेश जाधव हिने तब्बल १२६ गुण मिळवत विशेष कामगिरी नोंदवली. तसेच प्राची नितीन लेंभे ९६ गुण आकाश काकासाहेब चव्हाण ८७ गुण श्रावणी दत्तात्रय बोराडे ८४ गुण भारती नारायण पवार ८१ गुण साक्षी बळिराम भोजने ७६ गुण ऋतुजा विजय सुंदर्डे ७६ गुण मिनाक्षी भरत पदमुले ७४ गुण श्रुती लक्ष्मण गायकवाड ६८ गुण या सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करत शाळेचा लौकिक अधिकच उंचावला.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाची साथ

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे परिश्रम नियमित सराव व शिस्तबद्ध अभ्यासाची पायाभरणी महत्त्वाची ठरल्याचे मान्यवरांनी नमूद केले. शाळेच्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेले मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

गुणवंतांचा सत्कार

यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमास रोहिलागड बीटचे विस्तार अधिकारी श्रीमंत गंगावणे, जामखेड केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. विजय पंजरकर,मुख्याध्यापक दिलीप बोधगिरे,मा. मु. अ. गायकवाड, शा. व्य. स. अ. गणेश चेडे, उपाध्यक्ष प्रदीप जाधव, घायाळ, दत्तात्रय बोराडे, राजेंद्र बोराडे, गणेश जाधव, गीते, करपटे, औतकर आदी मान्यवर व शिक्षक उपस्थित होते.

उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. या दैदिप्यमान यशामुळे माळीवाडी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेच्या शैक्षणिक प्रगतीत आणखी भर पडली आहे. माळीवाडीची ही शैक्षणिक झेप भविष्यातही अशीच कायम राहो अशी अपेक्षा ग्रामस्थ व पालकवर्गातून व्यक्त होत आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजश्री
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# पोलिस स्टेशनचा फोन बंद; नागरिकांनी संपर्क साधायचा तरी कुठे....?

## लेंडलाईन चे फोन बंद झालंय घटनेची माहिती देण्यासाठी/घेण्यासाठी सपंर्क होतं नसल्याने सामान्य नागरिकांना होतेय त्रास.

तामसा ( प्रतिनिधी)

तामसा येथील पोलीस स्टेशनवर तब्बल ५० पेक्षा अधिक गावांच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी आहे. ग्रामीण व सीमावर्ती भागातील नागरिकांसाठी हे पोलीस स्टेशन सुरक्षेचा मुख्य आधार आहे. मात्र, अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे पोलीस स्टेशनमधील लँडलाइन फोन अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी पोलिसांशी संपर्क कसा साधायचा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते शहरात गावांमध्ये चोरी, मारहाण, अपघात, कौटुंबिक हिंसाचार किंवा इतर गंभीर गुन्ह्यांच्या वेळी तत्काळ पोलिसांशी संपर्क होणे अत्यावश्यक असते. परंतु लँडलाइन बंद असल्याने नागरिकांना प्रत्यक्ष ठाण्यात धाव घ्यावी लागते किंवा वैयक्तिक ओळखीच्या माध्यमातून संपर्क साधावा लागतो. ही बाब शहर ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत गैरसोयीची ठरत आहे.

यासंदर्भात अनेकदा तोंडी तक्रारी करण्यात आल्या असूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. नागरिकांची मागणी आहे की, पोलीस स्टेशनमध्ये अधिकृत मोबाईल क्रमांक उपलब्ध करून तो सार्वजनिक करावा. तसेच तो क्रमांक गावागावांत फलकाद्वारे, सोशल मीडियाद्वारे व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये जाहीर करावा, जेणेकरून आपत्कालीन वेळी त्वरित संपर्क साधता येईल.

तामसा पोलीस स्टेशनअंतर्गत चार बीट कार्यरत असून.... निवघा येथे एक आऊटपोस्ट आहे. मात्र, कोणत्या बीटवर कोणत्या पोलीस बीट जमादार ची नियुक्ती आहे, त्यांचे अधिकृत संपर्क क्रमांक काय आहेत, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती नागरिकांना उपलब्ध नाही. सामाजिक दृष्टीकोनातून ही माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी स्थानिक पोलीस निरीक्षकांकडे करण्यात आली होती परंतु या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

याशिवाय, काही कार्यक्रम किंवा सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येणाऱ्या शांतता समितीच्या बैठकीत पत्रकारांना निमंत्रण दिले जात नसल्याची तक्रार आहे. पोलीस-नागरिक- पत्रकार यांच्यातील समन्वयाचा अभाव स्पष्टपणे जाणवत असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व घटकांमध्ये संवाद आणि पारदर्शकता आवश्यक असताना हा तुटलेला संवाद चिंताजनक मानला जात आहे.

तसेच,तामसा, मनाठा, हदगांव पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात वाढत्या गंभीर घटनांच्या पार्श्वभूमीवर एका महिला पोलीस उप निरीक्षकाची नियुक्ती करण्याची मागणीही होत आहे. महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक प्रकरणे आणि संवेदनशील गुन्ह्यांच्या अनुषंगाने महिला अधिकाऱ्यांची गरज अधोरेखित केली जात आहे. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून याकडेही अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

एकूणच, सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये मूलभूत संपर्क व्यवस्था कोलमडलेली असणे ही गंभीर बाब आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना संबंधित यंत्रणांनी तात्काळ दखल घेऊन लँडलाइन सेवा सुरू करणे, अधिकृत मोबाईल क्रमांक जाहीर करणे व बीट अधिकाऱ्यांची माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे. अन्यथा आपत्कालीन वेळी पोलिसांशी संपर्क कसा साधायचा? हा प्रश्न अधिक तीव्र होत जाणार, यात शंका नाही.

# मार्च सुरूवातीलाच सावरमाळ येथे पाण्याची भीषण टंचाई

## प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना पाण्याची गैरसोय; व्यवस्थेवर रुग्ण नाराज

मुखेड ( प्रतिनिधी)

मार्च महिन्याला सुरुवात होताच पाण्याची भीषण टंचाई मुखेड तालुक्यातील सावरमाळ येथे निर्माण झाली आहे. जसा-जसा उन्हाळा जवळ जवळ येऊ लागतो तसं-तसं महिलांच्या मनामध्ये पाण्याबद्दल धडकी भरत असते. उन्हाळ्याचे चार महिने माहेरी गेलेलं बरं होईल असा विचार सावरमाळ येथील महिलांच्या मनात येत असतो.

वर्षानुवर्षे या गावात पाण्याची भीषण टंचाई भासत असते. याबाबत प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार करून सुद्धा प्रशासन याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचं मत येथील नागरिक व रुग्णांनी व्यक्त केला आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे परिसरातील रुग्ण शस्त्रक्रिया किंवा डिलिव्हरीसाटी दूर दुरून येत असतात. इथे आल्यानंतर त्यांना पुरेसं पाणी मिळत नसल्याने पाण्यासाठी वन वन भटकावं लागतं. सर्वसामान्य रुग्णांना प्रायव्हेट दवाखाना परवडत नसल्यामुळे गोरगरीब रुग्ण सरकारी दवाखान्यामध्ये ऍडमिट होतात. अशा ठिकाणी त्यांना अनेक समस्याला तोंड द्यावे लागते. दरम्यान शासनाला एकच विनंती आहे की दवाखान्यामध्ये एखादा बोर मारून पाण्याची अडचण दूर करावी अशी विनंती रुग्णाकडून सध्या होताना दिसत आहे. म्हणून सावरमाळ येथील पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन यावर उपाययोजना लवकरात लवकर करावी अशी मागणी सावरमाळ येथील नागरिक व रुग्णांनी केली आहे.

# देळूब बु.येथे आज सार्वजनिक शिवजन्मोत्सवा निमित्त व्याख्यानाचे आयोजन

अर्धापूर ( प्रतिनिधी)

तालुक्यातील देळुब बु.येथे शिवजन्मोत्सवा निमित्त शिवव्याख्याते शिवश्री किशन जाधव पाटील यांचे व्याख्यान दि.२८ शनिवारी रोजी सायंकाळी ७ वा.होणार आहे शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती समितीचे अध्यक्ष शैलेश पाटील लोमटे यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त देळूब बुद्रुक समस्त गावकरी मंडळी व सार्वजनिक शिवजयंती निमित्ताने शिवव्याख्याते शिवश्री किशन जाधव पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले आहे .या व्याख्यानाला अर्धापूर तालुक्यातील,पंचक्रोशीतील शिवप्रेमी जनतेनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती समितीचे अध्यक्ष शैलेश पाटील लोमटे, उपाध्यक्ष गणेश पानपट्टे, चंदु पाटील बोंढारे, सचिन बोंढारे, महारूद्र पारडकर, दत्ता पाटील कोल्हे, संतोष बोंढारे, केशव पाटील गरड, अनिल बाचेवार, दगडू पाटील गरड, संदिप बोंढारे यांनी केले आहे.



# महात्मा बसवेश्वर विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

अर्धापूर (प्रतिनिधी): भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या साठी असणारी राष्ट्रीय साधन-सह-गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना. एन. एम.एम. एस. या स्कॉलरशिप परीक्षेत महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय अर्धापूर येथील, शाळेतील तेरा विद्यार्थी या स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थिनी मिळवलेल्या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचा, शाळेच्या वतीने . याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका राऊबाई बिरादार (शेटे) यांनी पुष्पहार देऊन सन्मान केला. याप्रसंगी शाळेतील शिक्षक विजय दुगावकर, जेठन पवार, संतोष पिंपरे, वैशाली शिंदे, शिवकुमार शेटे व व विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या या यशस्वीते बद्दल संस्थेचे सचिव पंडितराव लंगडे, डॉ.विशाल लंगडे, डॉ. रघुनाथ शेटे यांनी अभिनंदन केले.

# राणी लक्ष्मीबाई विद्यालयात बारावी परीक्षेत हलगर्जीपणा

## केंद्रसंचालक व पर्यवेक्षकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित

नायगाव ( प्रतिनिधी)

तालुक्यातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ दरम्यान झालेल्या जीवशास्त्र विषयाच्या पेपर च्या दिवशी गंभीर हलगर्जीपणामुळे नायगाव तालुक्यातील बहुचर्चित राणी लक्ष्मीबाई परीक्षा केंद्रातील केंद्रसंचालक व संबंधित पर्यवेक्षकांवर निलंबनाची कारवाई संस्था चालक यांच्या कडे पत्र पाठवून जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने माध्यमिक शिक्षणाधिकारी नांदेड यांच्या कडून पत्र पाठवून प्रस्तावित करण्यात आली आहे.या मुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

कदम धनाजी सहशिक्षक संत ज्ञानेश्वर विद्यालय धुपा, केंद्रसंचालक (राणी लक्ष्मीबाई कनिष्ठ महाविद्यालय, ता. नायगाव) यांच्याकडे इयत्ता १२ वी परीक्षेचे केंद्रसंचालक म्हणून जबाबदारी होती. तर गडगा येथील नाथोबा विद्यालयाचे सह शिक्षक श्रीकांत पाटील हे पर्यवेक्षक म्हणून कार्यरत होते.

दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी दिवसभरात झालेल्या विषयाच्या पेपरदरम्यान मा. उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (भा.रा.शि.) राठोड यांनी केंद्रास भेट दिली असता गंभीर अनियमितता निदर्शनास आल्या.तपासणीत आढळलेल्या प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे -मंडळाच्या सूचनांनुसार तसेच कॉपीमुक्त अभियानाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांची व्यवस्थित तपासणी करण्यात आली नव्हती. त्यामुळे एका परीक्षार्थ्याकडे मोठ्या प्रमाणात गैरप्रकाराचे साहित्य आढळून आले.पर्यवेक्षकांना त्यांच्या कामकाजाबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले नव्हते.काही पर्यवेक्षकांनी कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले असून संबंधितांना जबाबदार धरण्यात आले आहे.

परीक्षा केंद्रात प्रशासनाकडून शिस्तबद्ध नियोजन व नियंत्रणाचा अभाव दिसून आला.जिल्हा दक्षता समितीने वारंवार सूचना करूनही केंद्रावर अपेक्षित ती कार्यवाही न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामुळे परीक्षा प्रक्रियेबाबत केंद्रसंचालकांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे प्राथमिक निष्कर्षात स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली १९८१ नुसार केंद्रसंचालक व संबंधित पर्यवेक्षकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून, त्याबाबतचा अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे अगोदरच नायगाव तालुक्यात चर्चेत असलेले राणी लक्ष्मीबाई विद्यालय येथील कारभाराबद्दल प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे .पण या प्रकरणाचा नाहक बळी केंद्रसंचालक व पर्यवेक्षक ठरल्याची तालुक्यातील शैक्षणिक वर्तुळात चर्चा असून या घटनेने खळबळ उडाली असून परीक्षेच्या नियोजनात होणाऱ्या त्रुटी व हलगर्जी पना व पारदर्शकतेबाबत प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा

## इंग्रजी शिका, पण मराठी विसरू नका - प्रा. विकास ढोकणे

प्रतिनिधी । बीड

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची ओळख, इतिहासाची साक्ष, संस्कारांची परंपरा आहे. आपण इंग्रजी, हिंदी किंवा इतर भाषा नक्की शिकलो पाहिजे. मात्र आपल्या मराठी भाषेचा सन्मान आणि वापर कधीही कमी होता कामा नये. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा आणि संत गाडगेबाबा यांनी मराठी भाषेतून समाजप्रबोधन केले. ही परंपरा जपणे हीच खरी मराठीची सेवा आहे, असे प्रतिपादन शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे यांनी केले. ते आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे मराठी भाषा गौरव दिन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जय मराठी, जय महाराष्ट्रच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी मराठी भाषेप्रती आपला अभिमान व्यक्त केला. २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त 'मराठी भाषेचा




गौरव आणि साहित्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुढे बोलताना प्रा. ढोकणे यांनी मराठी भाषेचा इतिहास, परंपरा, वैभव अधोरेखित केले. सातवाहन राजांची राजधानी प्रतिष्ठान म्हणजे आजचे पैठण होते. त्यांच्या काळात मराठी भाषेचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला, असे त्यांनी सांगितले. पुढे मुकुंदराज, चांगदेव यांनी 'विवेकसिंधू'सारखे ग्रंथ लिहिले. त्यांनी मराठी साहित्य समृद्ध केले, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. राहुल खडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआय महाविद्यालयाचे प्राचार्य वाघ उपस्थित होते. विभागप्रमुख एस. आय. शेख, पी. डी. दुधाळ तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रस्तावना प्रा. अजय दुधाळ यांनी केली. मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. आभार प्रा. दुधाळ यांनी मानले.

विद्यार्थ्यांची मराठी संवर्धनाची शपथ

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांनी दैनंदिन व्यवहारात मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्याची शपथ घेतली. शुद्ध उच्चाराने मराठी बोलणे, योग्य व्याकरणाचा वापर करणे आणि सोशल मीडियावरही मराठीचा सन्मान राखणे, असा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. मराठी माझी मायबोली, मराठी माझा अभिमान अशी घोषणा देत विद्यार्थ्यांनी मराठी भाषा जपण्याचा संकल्प केला.

# पद्मश्री श्री.अच्युत पालव यांच्या पुस्तकात भवरवाडी शाळेचा गौरव

आष्टी - (राजेंद्र लाड)

सुप्रसिद्ध सुलेखनकार तथा पद्मश्री पुरस्काराने सन्मानित श्री. अच्युत पालव यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रदर्शित केलेल्या पुस्तकात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भवरवाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथील उपक्रमाचा विशेष उल्लेख केला आहे. ग्रामीण भागातील एका प्राथमिक शाळेच्या कार्याची राज्यपातळीवर दखल घेतली जाणे, ही संपूर्ण बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. मराठी भाषा ही आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि अस्मितेची जपणूक करणारी समृद्ध भाषा आहे. या भाषेच्या संवर्धनासाठी आयुष्य वेचणाऱ्या श्री. अच्युत पालव सरांनी आपल्या पुस्तकात भवरवाडी शाळेच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा उल्लेख करत शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. त्यांच्या शब्दांनी शाळेला केवळ गौरवच मिळाला नसून पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा मिळाली आहे.

भाषाप्रेम जागवणारे विविध उपक्रम

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भवरवाडी येथे मराठी भाषा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये सुलेखन स्पर्धा, वाचन प्रेरणा अभियान, भाषिक सर्जनशीलता उपक्रम, कथा-वाचन सत्रे, कविता सादरीकरण, शब्दसंपदा वाढविण्याच्या स्पर्धा अशा अनेक कृतींचा समावेश असतो. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड




**मराठी भाषा दिनी जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण**

निर्माण होऊन भाषेप्रती प्रेम आणि अभिमान वृद्धिंगत होत आहे.

विशेष म्हणजे, शाळेतील शिक्षकवृंद विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता भाषेचा सर्जनशील वापर करण्यास प्रोत्साहित करतात. हस्ताक्षर सुधारणा, विचारमंथन, लेखनकौशल्य विकास आणि वाचन संस्कृती जोपासण्यावर भर दिला जातो. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही आत्मविश्वास वाढताना दिसत आहे.

अशा नामवंत सुलेखनकाराच्या पुस्तकात शाळेचा उल्लेख होणे म्हणजे शाळेच्या कार्याला मिळालेली मोठी पावती आहे. हे यश केवळ शाळेपुरते मर्यादित नसून संपूर्ण भवरवाडी गावासाठी गौरवाची बाब आहे. गावकऱ्यांमध्येही या घटनेमुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेचे शिक्षक अनिल बेंद्रे यांनी सांगितले की, श्री. अच्युत पालव सरांनी आमच्या उपक्रमांचा गौरव केल्याने विद्यार्थ्यांना अधिक प्रेरणा मिळेल. भविष्यातही मराठी भाषेच्या संवर्धनासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून ग्रामीण भागातून आदर्श निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. मराठी भाषा ही आपल्या ओळखीचा पाया आहे. तिच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. भवरवाडी शाळेच्या या यशाने निश्चितच इतर शाळांसाठीही प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. मराठी भाषा जपूया, वाढवूया आणि अभिमानाने पुढे नेऊया!